# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org; roaurangabad.dte@gmail.com;


जावक क्र विकाऔ/शिक्षण/१२/७०६

दिनांक ७ /२/२०१२

प्रति

प्राचार्य,

शासकीय/विनाअनुदानित

पदवीका संस्था

औरंगाबाद विभाग

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्राप्त प्रवेश क्षमता वाढ/घट, नवीन अभ्यासक्रम, दुस-या पाळीच्या (सेकंड शिफ्ट) प्रस्तावाबाबत.

संदर्भ :- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र १०/ एनजीपी/पदवीका /२०१२/७४ दि. : ७/२/२०१२

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता सोबत जोडलेल्या यादीतील संस्थांनी प्रवेश क्षमता वाढ/घट,नवीन अभ्यासक्रम, दुसरी पाळी (सेकंड शिफ्ट) साठी प्रस्ताव सादर केलेले असून या संस्थांची सुनावणी तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई येथे दि १०/२/२०१२ रोजी दुपारी २.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आलेली आहे. संबंधितांनी आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह सुनावणीस उपस्थित राहवे.

तसेच संबंधित संस्थांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी छाननी शुल्क रू.१५०००/- चा डिमांड ड्राफ्ट औरंगाबाद येथे देय असलेला सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय औरंगाबाद यानावे काढून या कार्यालयात जमा करावा व त्याबाबतची पावती सुनावणीच्या वेळी तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करावी.

सहपत्र :- दि २४/१/२०१२ च्या शासन निर्णयाची प्रत.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

औरंगाबाद

| Sr. No. | Name & address of the Society / Trust | Name & address of the Inst. at permanent Site |
|---|---|---|
| 1 | Matoshri Pratishthan, Jijau Nagar, Nanded Latur Highway, At Khupsarwadi, Post Vishnupuri, Nanded-431606. | Vishwabharti Polytechnic Institute, Jijau Nagar, Nanded Latur Highway, At Khupsarwadi, Post Vishnupuri, Nanded-431606. |
| 2 | Shriram Pratishthan, C/o- Apurva Hospital, Nutan Road, Selu-431503, Dist Parbhani | Apurva Polytechnic, Gat No. 88/02, Rawalgaon Road, selu - 431503, Parbhani |
| 3 | Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Sanstha, Kanchanwadi, Paithan Road, Aurangabad-431005 | C.S.M.S.S. College of Polytechnic, Kanchanwadi, Paithan Road, Aurangabad-431005 |
| 4 | Nutan Vidya Samitee Parbhani, C/o-Marathwada High School, Khandoba Bazar, Parbhani-431401 | Sitaramji Mumdada Marathwada Polytechnic, Khandoba Bazar, Parbhani-431401 |
| 5 | Sahayog Sevabhavi Sanstha, At Post Vishnupuri, Tal Dist Nanaded-431606 | Indira Institute of Technology (Polytechnic), Gat No. 18 & 22, , At Post Vishnupuri, Tal Dist Nanaded-431606 |
| 6 | Mahatma Basaveshwar Education Society, C/o Deshikendra Vidyalaya, Signal Camp, Latur-413512. | Kai Pujya Trimbakappa Basavantappa Girwalkar Polytechnic, Yeshwantrao Chavan Chowk, Ambajogai, Beed-431517 |
| 7 | Marathwada Shikshan Prasarak Mandal, Deogiri Boys Hostel, Railway Station Road, Aurangabad-431001. | Yashwantrao chavan Institute of Polytechnic, Survey No. 107, 109, Wasanwadi, Beed-431122. |
| 8 | Directorate of Technical Education, Mumbai. | Government Polytechnic, P-9, MIDC, Limbala, Hingoli-413531 |
| 9 | Directorate of Technical Education, Mumbai. | Government Polytechnic, Ambad, Mhada Colony, Pachod Road, Ambad-431204. |
| 10 | Gramaudyogik Shikshan Mandal, MIT Campus, Beed By Pass, Aurangabad-431028. | Marathwada Institute of Technology, Beed By Pass, Aurangabad-431028. |
| 11 | Mahatma Gandhi Mission, 12, Bhagyanagar, Nanded-431602 | MGM's Polytechnic, N-6, CIDCO, Aurangabad-431003. |
| 12 | Bhartiya Gramin Punarrachana Sanstha, Swami seven Hills, Shivaji Nagar, Jalna Road, Aurangabad-431001 | Shri Sai Institute of Technology, Plot No P-75, Behind Garware Polyester Ltd., MIDC, Chikalthana, Aurangabad-431001. |
| 13 | Shri Sai Janvikas Pratisthan, Tulsi Arked CIDCO, Aurangabad-431004 | Sou Shardabevi Pandit Polytechnic Institute, At Gadpati, Alani, Osmanabad-413501 |
| 14 | Shri Bhairavnath Nisarg Mandal, Subhash Road, Aurangabad-Beed Highway, Beed-414001. | S.B.N.M. D. Pharmacy College, At Gadpati, Alani, Osmanabad-413501. |

विना अनुदान तत्त्वावर नवीन तंत्रशिक्षण संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

शासन निर्णय क्रमांक - सीटीसी-२०११/(प्र.क्र.४२/११)/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २४ जानेवारी, २०१२.

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग कमांक : पीईसी-२०९७/(१३८/९७)/ तांशि-१, दिनांक ११.०८.१९९८.

२) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांचे क्रमांक : २/एनजीसी/२०००/ ४९२६, दिनांक २६.१२.२००० चे पत्र.

३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग कमांक : पीईसी-२००१/(९/२००१)/ तांशि-१, दिनांक २९.०८.२००१.

**प्रस्तावना :-** विना अनुदान तत्त्वावर नवीन तंत्रशिक्षण संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २९.०८.२००१ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सदर आदेशाची अंमलबजावणी २०११-१२ या शैक्षणिक वर्षापर्यंत करण्यात आलेली आहे. तथापि, आता प्रस्तावाच्या तपासणीची प्रक्रिया करण्याच्या खर्चामध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे तसेच प्रस्तावाच्या संख्येमध्ये दरवर्षी वाढ होत असल्यामुळे त्याचप्रमाणे यापूर्वीच्या शुल्क निश्चितीला १० वर्षाचा कालावधी झालेला असल्याने त्यात सुधारणा अपेक्षित आहे. तसेच संस्था बंद पडल्यानंतर तेथील कर्मचाऱ्यांकरिता वेतन व इतर आर्थिक फायदे देण्याबाबत संस्थेकडून विलंब होतो किंवा ते दिले जात नाही. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात. अशा वेळी कोर्टाकडून तंत्र शिक्षण संचालनालयावर जप्तीचे आदेश दिले जातात इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन नोंदणी शुल्क व मुदत ठेवीच्या रकमेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** आता या शासन निर्णयान्वये विना अनुदान तत्त्वावर नवीन तंत्र शिक्षण संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारण्यासाठी व संयुक्त खात्यात सुधारित मुदत ठेव ठेवण्यासाठी मंजूरी देण्यात

येत आहे. या शासन निर्णयानुसार नोंदणी शुल्कात आणि मुदत ठेवीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

सुधारित नोंदणी शुल्क

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र | उर्वरित महानगरपालिका | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषध निर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ,ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी /पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये | रु. २,२५,०००/- | रु.१,५०,०००/- | रु. १,१२,५००/- | रु. ७५,०००/- |
| २ | नवीन अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषध निर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था | रु. १,५०,०००/- | रु. १,१२,५००/- | रु. ७५,०००/- | रु. ४५,०००/- |
| ३ | नवीन पदव्युत्तर पदवी /नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांची महाविद्यालये | रु. १,५०,०००/- | रु. १,१२,५००/- | रु. ७५,०००/- | रु. ४५,०००/- |
| ४ | सुरु असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन पदवी/ पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे व पदवी अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करण्याचे प्रस्ताव | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ५. | सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन पदवी / पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे व पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करण्याचे प्रस्ताव | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ६ | अखिल भारतीय तंत्र शिक्षणाच्या अखत्यारीत नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३०,०००/- | रु. १५,०००/- |

सुधारित मुदत ठेव

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १ | पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये | रु. २२,५०,०००/- | रु. २२,५०,०००/- |
| २ | औषध निर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये | रु. १२,००,०००/- | रु. १०,५०,०००/- |
| ३ | एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजीडीबीएम अभ्यासक्रमांची पदव्युत्तर पदवी महाविद्यालये | रु. १०,५०,००० | रु. ९,००,०००/- |
| ४ | अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांची नवीन तंत्रनिकेतने | रु. ९,००,०००/- | रु. ७,५०,०००/- |
| ५ | वास्तुविद्या/औषध निर्माणशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था | रु. ७,५०,०००/- | रु. ७,५०,०००/- |
| ६ | संगणक प्रगत अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था | रु. ३,००,०००/- | रु. ३,००,०००/- |
| ७ | पदवी/पदव्युत्तर पदवी अतिरीक्त अभ्यासक्रम | रु. ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ८ | पदविका अतिरीक्त अभ्यासक्रम | रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ९ | वाढीव प्रवेशक्षमता पदवी/पदविका (६० पर्यंत काही नाही व ६० पेक्षा जास्तसाठी) | रु. १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १० | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीक) | रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ११ | एम.ई/एम.टेक/एम. फार्म इत्यादी व इतर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम | रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |

२. टेक्नीकल कॅम्पस स्वरुपात संस्था सुरु केल्यास संस्थांना त्या त्या अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र नोंदणी शुल्क आणि मुदत ठेव संस्थेस भरावी लागेल.

३. सदरहू मुदत ठेव ही १० वर्षापर्यंत बँकेत ठेवण्यात यावी. त्या रकमेचे व्याज संस्थेच्या खात्यात जमा करावे आणि १० वर्षानंतर सदरहू मुदत ठेव संस्थेला परत करण्यात यावी. मात्र सदरहू सुधारित योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई